# महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम- १९९८.

## व्याख्या :-

१. **लेखा अधिकारी-** गट- ड कर्मचाऱ्यांच्या बाबत कार्यालयाचे प्रमुख, इतर गटाचे कर्मचाऱ्यांचे बाबतीत महालेखापाल.

२. **वित्तलब्धी-** वेतन/रजा वेतन आणि त्यामध्ये महागाई वेतन यांचा समावेश होतो. तसेच निर्वाह वेतनाचा देखिल अंर्तभाव होतो.

३. **कुटूंब-**

अ) पुरुष कर्मचाऱ्याच्या बाबतीत, वर्गणीदाराची बायको किंवा बायका, आई-वडील, मुले, अज्ञान भाऊ, अविवाहित बहिणी.

ब) स्त्री वर्गणीदाराचे बाबतीत-वर्गणीदाराचा पती, आई-बाप, मुले, अज्ञान भाऊ, अविवाहित बहिणी.

४. **निधी-** किंवा भविष्य निर्वाह निधी.

५. **रजा-** म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१.

६. **वर्ष-** म्हणजे वित्तीय वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च.

७. **स्वीयेतर सेवा-** म्हाजे ज्या सेवेसाठी शासकीय कर्मचाऱ्याला भारताच्या किंवा एखाद्या राज्याच्या किंवा एखाद्या संघराज्योत्राच्या एकत्रित निधी व्यतिरिक्त कोणत्याही इतर साधनांव्दारे शासनाच्या मंजुरीने वेतन मिळते ती सेवा.

८. **विभाग प्रमुख-** म्हणजे वेळोवेळी सुधारणा केल्याप्रमाणे म.ना.से.(सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ च्या परिशिष्ट-दोन मध्ये नमुद केलेल्या अधिकाऱ्यांचा समावेश असलेले अधिकारी.

९. **शासन-** म्हणजे महाराष्ट्र शासन

१०. **गट- ड सेवा** म्हणजे दिनांक २९ जुलै १९९३ अन्वये गट ड म्हणून वर्गीकृत सेवा.

११. **रजा वेतन-** रजा काळात मिळणारे मासिक रजा वेतन.

**पात्रतेच्या शर्ती :-** एक वर्षाची अखंड सेवा पूर्ण केलेले सर्व अस्थायी शासकीय कर्मचारी, पुन्हा सेवेत घेतलेले सर्व निवृत्तिवेतनधारी आणि सर्व स्थायी कर्मचारी.

**नामनिर्देशन : निधी मध्ये जमा होणारी रक्कम कर्मचाऱ्याचा मृत्यु झाल्यास ही रक्कम मिळण्याचा हक्क एक किंवा अधिक व्यक्तींना प्रदान करणारे नामनिर्देश करणे होय.**

**वर्गणीदारांचे लेखे :प्रत्येक वर्गणीदाराच्या नावे खाते उघडण्यात येईल व त्यात वर्गणीची रक्कम, त्यावरील व्याज, शासनाच्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशान्वये त्याच्या खात्यात वेतन-भत्यांची थकबाकी जमा करण्यात येईल. निधी मधून घेतलेली अग्रीमे व काढलेल्या रकमा दाखविण्यात येतील.**

## वर्गणीदाराच्या शर्ती अणि दर :

- वर्गणीदार तो निलंबित असतानाचा  कालावधी बेरीज  करुन दरमहा निधी मध्ये अंशदान देईल.
- वर्गणीदार रजेवर असेल त्याला रजा वेतन मिळणारे वेतन अर्धवेतना इतेक किंवा त्याहून  मी असेल तर रजेच्या  काळात वर्गणी देणे हे त्याच्या स्वेच्छाधीन राहील.
- वर्गणीचा दर पूर्ण रुपयात असेल.
- वर्गणी त्याच्या वित्तलब्धीच्या ६ टक्के  पेक्षा  कमी असणार नाही.
- वर्गणीची कमाल रक्कम  कर्मचाऱ्याच्या वित्तलब्धी पेक्षा जास्त असाार नाही.
- नियतवयोमानानुसार सेवा निवृत्तिच्या शेवटच्या तीन महिन्यापूर्वी निधीमध्ये वर्गणी भरणार नाही.

## वर्गणीची वसुली :

- वर्गणी आणि अग्रीम रकमेचे हप्ते कर्मचाऱ्याच्या वेतनातून वसूल करणे.
- स्वीयेतर सेवेच्या बाबतीत संबंधित नियोक्ता किंवा कर्मचारी म.को.नि.११२ मधील तरतुदी नुसार चलनाने प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपूर्वी शासन जमा करेल.
- वर्गणीच्या थकबाकीची रक्कम व्याजासहित देय आहे.

## व्याज :

- शासनाने वेळोवेळी जाहिर केलेल्या दराने निधीतील संचित रकमेवर व्याज जमा करण्यात येते.
- प्रत्येक वर्षाच्या शेवटच्या दिवशी व्याज जमा केले जाते.
- वित्तलब्धीमधून करण्यात आलेल्या वसूलीच्या बाबतीत वसुली ज्या महिन्यात करण्यात आली त्या महिन्याचा पहिला दिवस हा ठेवीचा दिनांक असल्याचे समजण्यात येईल.
- वर्गणीदाराने अग्रेषित केलेल्या रकमेच्या बाबतीत त्या महिन्याच्या पाच ताराखेच्या आंत लेखा अधिकाऱ्याला ती रक्कम पोहोचली असेल तर प्राप्त झालेल्या महिन्याचा पहिला दिवस आणि त्या महिन्याच्या पाच तारखे नंतर मिळाली असेल तर पुढील महिन्याचा पहिला दिवस समजयात येईल.

- कर्मचाऱ्याने कमाल मर्यादेपेक्षा जास्त वर्गणी भरली असेल तर त्यास जास्तीच्या वर्गणीवर व्याज मिळणार नाही.
- नियतवयोमानानुसार सेवा निवृत्तिच्या बाबतीत पुढील सहा महिन्या पर्यंत व्याज दिले जाते.
- वर्गणीदार बेपत्ता झालेला आढळल्यास कर्मचाऱ्याला शोधून काढण्यात आलेले नाही अशा अर्थाचे पोलिसां कडून मिळेलेल्या अहवालाच्या तारोपासून ६ महिन्या पर्यंतचे व्याज देण्यात येते.

## नियम- १३. निधीमधून मिळणारी अग्रिमे.

१. मंजुरी देणारा योग्य प्राधिकारी कोणत्याही वर्गणीदारास त्याच्या तीन महिन्याच्या वेतनापेक्षा अधिक नसेल एवढी किंवा त्याच्या खाती जमा असलेल्या रकमेच्या निम्मी रक्कम या पैकी कमी असणारी रक्कम पुढील कारणांसाठी मंजूर करेल.

- आजारपण, प्रसुती किंवा विकलांगता या संबंधीचा खर्च भागविण्यासाठी या मध्ये आवश्यक असल्यास प्रवास खर्चाचा समावेश होईल.
- उच्च शिक्षणाचा खर्च भागविण्यासाठी.
- वर्गणीदार त्याच्या कुटुंबातील एखादी व्यक्ती किंवा त्याच्यावर प्रत्यक्ष अवलंबून असलेली एखादी व्यक्ती यांचा वांड:निश्चय, विवाह, किंवा इतर धार्मिक कार्य यांचा खर्च भागविण्यासाठी.

- वर्गणीदार किंवा त्याच्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीवर दाखल झालेल्या कायदेशीर कारवाईचा खर्च भागविण्यासाठी. तसेच त्याच्या विरुध्द दाखल करण्यात आलेल्या दाव्याच्या संदर्भातील बचाव करण्यासाठी विधी व्यवसायिक नेमणे करिता.
- घराच्या किंवा सदनिकेच्या किंवा एखाद्या निवासस्थानाच्या बांधकामासाठी.
- दूरचित्रवाणी किंवा प्रकाशीत किंवा कपडे धुण्याचे यंत्र किंवा सुर्यचूल खरेदी करण्यासाठी.
- २. वरील कारणां व्यतिरिक्त इतर कारणांसाठी मंजूरी प्राधिकाऱ्याची खात्री झाल्यानंतर अग्रिम मंजूर करता येईल.

- **३. पूर्वी घेतलेल्या अग्रीमाचे निदान बारा हप्ते किंवा अग्रिमाचा शेवटचा हप्ता या पैकी जो आधी असेल त्याची परतफेड करेपर्यत पुढील अग्रिम मंजूर करता येणार नाही.**
- **४.** पोटनियम १३(३) अन्वये अग्रीम मंजूर केले तर पूर्वीच्या वसूल न झालेल्या अग्रिमाची शिल्लक रक्कम पूर्वीच्या हप्त्याची परतफेड करण्यापूर्वी मंजूर करण्यात आलेल्या अग्रिमात मिळविण्यात येईल.
- **नियम क्र . १४- अग्रिमाची वसुली :**
- नियम १३(१) अंतर्गत येणाऱ्या प्रकरणांचे बाबतीत किमान १२ व कमाल २४ हप्त्यांमध्ये वसूल करावयाचे आहे. तथापि वर्गणीदाराने इच्छा व्यक्त केल्यास हप्ते कमी करता येतील. पोट नियम १३(२) खालील अग्रिमाची रक्कम वर्गणीदाराच्या तीन महिन्याच्या वेतनापेक्षा जास्त किंवा शिल्लक रकमेच्या निम्म्या पेक्षा अधिक होईल **अशा विशेष प्रकरणामध्ये मंजुरी प्राधिकारी हप्त्यांची संख्या ३६ पेक्षा अधिक होणार नाही.**

- वसुली ज्या महिन्यात अग्रिम काढणेत आले त्या महिन्या नंतरच्या महिन्याच्या वेतनापासून सुरु केली जाईल.
- निर्वाह भत्ता मिळत असेल किंवा तो दहा दिवसांपेक्षा अधिक काळ रजेवर असेल आणि रजा वेतन मिळणार नसेल किंवा अर्धवेतनाच्या बरोबर किंवा कमी असेल तर वर्गणीदाराच्या संमत्ती शिवाय अग्रिमाची वसुली केली जाणार नाही.
- मंजूर अग्रिम आणि प्रत्यक्ष घेतलेले अग्रिम नंतर त्याची परतफेड होण्यापूर्वी नामंजूर करण्यात आले तर संपूर्ण किंवा शिल्लक रक्कम एक रकमी तात्काळ भरावी लाोल.
- त्यात सूर केल्यास मंजुरी प्राधिकारी एक रकमी किंवा बारा पेक्षा अधिक नाही अशा हप्त्यांमध्ये वित्तलब्धीतून वसूल करेल.

- नियम १५- अग्रिमाचा अयोग्य विनियोग :
- दिलेले अग्रिम ज्या प्रयोजना करिता देण्यात आले होते त्या प्रयोजनासाठी वापरले गेले नाही तर अग्रिमाची रक्कम तात्काळ परत करण्याचे मंजूरी अधिकारी निर्देश देईल.
- नियम-१६- निधी मधून रक्कम काढणे:
- नियम- १३(२) अन्वये अग्रिम मंजूर करण्यास सक्षम असणाऱ्या प्राधिकाऱ्यां-ना विशेष कारणास्तव पुढील पैकी कोणत्याही वेळी रक्कम काढयास मंजूरी देता येईल.
- (अ) वर्गणीदाराची २० वर्षाची सेवा पूर्ण झाले नंतर किंवा सेवा निवृत्ति पूर्वी दहा वर्ष या पैकी जी घटना अगोदरची असेल त्यावेळी-
- वर्गणीदार व त्याच्या कुटुबातील व्यक्ती यांना प्रवासखर्चासह उच्च शिक्षणाचा खर्च भागविण्यासाठी.
- वांङ:ा-िश्चय किंवा विवाह.
- आजारपण.

- **(ब) वर्गणीदाराची सेवा १० वर्षे पूर्ण झाल्यानंतर किंवा नियतवयोमानानुसार सेवा निवृत्तिच्या तारखेपूर्वी दहा वर्षांच्या कालावधित या पैकी जी घटना अगोदरची असेल त्या वेळी पुढील पैकी एका प्रयोजनार्थ--**
- घर किंवा सदनिका बांधणे, खरेदी करणे.
- वरील कारणासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड करणे.
- मालकिच्या असलेल्या घराची पूर्नरचना करणे किंवा त्यामध्ये भर घालणे.
- विमा योजनेत वार्षिक वर्गणी भरणे
- वर्गणीदाराची १५ वर्षे सेवा झाल्यानंतर किंवा सेवानिवृत्त होण्याच्या पाचवर्षे आधी-- मोटारगाडी खरेदी करणे, त्या करिता घेतलेल्या कर्जाची परतफेड करणे.
- या प्रयोजनार्थ फक्त एकदाच रक्कम घेता येईल. परंतु मुलांचा विवाह, शिक्षण, किंवा निरनिराळे उद्‌भवणारे आजार किंवा घर अथवा, घर/सदनिका यात पुर्नरचना किंवा वाढ हे एकच प्रयोजन समजले जाणार नाही.

## नियम-१७ परतावा योग्य अग्रिम मंजूर करण्याचा अधिकार.

- जमा वर्गणी बद्दल खात्री करुन घेणे.
- मंजूरी आदेशात भविष्य निर्वाह निधी क्रमांक, जमा रकमेचा तपशिल नमूद करणे.
- वसूली बाबत मासिक हप्ता रक्कम व संख्या निश्चित करुन देणे.
- प्रत लेखा अधिकाऱ्यास पाठविणे.

## नियम- १८ रकमा हप्त्यांनी काढता येणे.

- उच्च शिक्षणावरील खर्च भागविण्या करिता द्यावयाचे अग्रिम एका पेक्षा जास्त हप्त्यांत देता येईल.
- घर बांधणी, पुर्नरचना, या करिता दोन पेक्षा कमी नाही आणि चार पेक्षा जास्त नाही अशा समान हप्त्यात रक्कम देता येईल.

- **नियम- २३-** नियत सेवा निवृत्तिपूर्वी १२ महिन्यामध्ये कोणतेही कारण न देता जमा रकमेच्या ९० टक्के पर्यत रक्कम काढयास परवानगी देता येईल.
- **नियम- २४-** नियम १६ मधिल विनिर्दिष्ठ कारणासाठी नियम १३ अन्वये रक्कम काढली असल्यास शिल्लक रकमेचे अंतिमरित्या काढावयाच्या रकमेत रुपांतर करता येईल.
- **नियम- ३०- ठेव संलन विमा योजना.**
- वर्गणीदाराच्या मृत्यु नंतर वर्गणीदाराच्या खाती जमा असलेली रक्कम मिळण्याचा हक्क असलेल्या व्यक्तीस, मृत्युच्या लातपूर्वीच्या तीन वर्षामध्ये (३६ महिने) त्याच्या खाती शिल्लक असलेल्या सरासरी वर्गणीच्या रकमेएवढी किंवा जास्तीत जास्त रुपये ६०,०००/- रक्कम मिळेल. त्यास शर्ती अशा

- **वर्गणीदाराच्या खाती जमा असलेली वर्गणीची रक्कम त्याच्या मृत्युच्या निकटपूर्वीच्या तीन वर्षामध्ये कोणत्याही वेळी पुढील मर्यादेपेक्षा कमी असता कामा नये.**
- **१) वेतनश्रेणीमधील पे बँड-२ (रुपये ९३००-३४८००) किंवा त्या वरील पद धारण करणारे आणि प्रतिमहा रु. ४८००/- वा अधिक ग्रेड पे घेणाऱ्या वर्गणीदाराच्या प्रकरणी रुपये २५०००**
- **२) वेतनश्रेणीमधील पे बँड-२ (रुपये ९३००-३४८००) मध्ये पद धारण करणारे आणि प्रतिमहा रु. ४२००/- परंतू प्रतिमहा रु. ४८००/- पेक्षा कमी ग्रेड पे घेणाऱ्या वर्गणीदाराच्या प्रकरणी रुपये १५०००/-**
- **३) वेतनश्रेणीमधील पे बँड-२ पे बॅड १ किंवा पे बँड-१ (रुपये ४४४०-७४४०) मध्ये पद धारण करणारे आणि प्रतिमहा रु. १४००/- वा अधिक परंतू प्रतिमहा रु. ४२००/- पेक्षा कमी ग्रेड पे घेणाऱ्या वर्गणीदाराच्या प्रकरणी रुपये १००००/-**
- **४) ेतनश्रेणीमधील पे बँड-२ पे बॅड १ (रुपये ४४४०-७४४०) मध्ये पद धारण करणारे आणि प्रतिमहा रु. १३००/- वा अधिक परंतू प्रतिमहा रु. १४००/- पेक्षा कमी ग्रेड पे घेणाऱ्या वर्गणीदाराच्या प्रकरणी रुपये ६०००/-**

- **Interest calculation sheet in respect of Shri- x.y.z., Peon for the year 2012-13**
- 1. Opening balance of GPF. 79419 /-
- 2. Monthly subscription Rs. 1000/-
- 3 .6th pay arrears 4th installment credited in GPF May paid in June 2012 Rs. 10172/-
- 4 .Refundable advance sanctioned & paid in Dec.12 Rs. 60000/-
- 5. Refund of advance in 12 monthly equal installment of Rs. 5000/-
- 6. Recovery started from January paid in February 2013
- 7 .Rate of interest 8.8% p.a.

| Sr.No. | Month & Year | Monthly Subscription Rs. | Refund of Advances Rs. | Total (Col. 3 + 4) Rs. | Withdrawals (Refundable /Non-refundable) Rs. | Interest bearing balance amount. Rs. (Col. OB+5-6) | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | Apr-12 | 1000 | 0 | 1000 | 0 | 80419 | |
| 2 | May-12 | 1000 | 0 | 1000 | 0 | 81419 | |
| 3 | Jun-12 | 1000 + 10172 | 0 | 1000 | 0 | 82419 | 4th installment |
| 4 | Jul-12 | 1000 | 0 | 1000 | 0 | 83419 | |
| 5 | Aug-12 | 1000 | 0 | 1000 | 0 | 84419 | |
| 6 | Sep-12 | 1000 | 0 | 1000 | 0 | 85419 | |
| 7 | Oct-12 | 1000 | 0 | 1000 | 0 | 86419 | |
| 8 | Nov-12 | 1000 | 0 | 1000 | 0 | 87419 | |
| 9 | Dec-12 | 1000 | 0 | 1000 | 60000 | 28419 | Vr. No. 676 / 20-12--13 |
| 10 | Jan-13 | 1000 | 0 | 1000 | 0 | 29419 | |
| 11 | Feb-13 | 1000 | 5000 | 6000 | 0 | 35419 | |
| 12 | Mar-13 | 1000 | 5000 | 6000 | 0 | 41419 | 1/12. |
| | Total- | 12000 | 10000 | 22000 | 60000 | 806028 | 2/12. |

| Interest = Total amt. of IBB / 12 x Rate of interest | | | | | With drawable amount. Rs. | Non with drawable amount Rs. | Total Amount. Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Interest:- 806028/12x8.8 = 5910.87 i.e. 5911/- | | | | | | | |
| | | | | | | | |
| 1 | Opening Balance i.e. closing balance of- 2011-12 | | | | 79419 | 0 | 79419 |
| 2 | Receipt of subscription and refunds | | | | 22000 | 40688 | 62688 |
| 3 | Interest for- 2012-13 | | | | 5911 | 8626 | 14537 |
| 4 | **Details of 6th Pay Arrears -** | | | | 0 | 0 | 0 |
| | | | Instal. | Interest. | 0 | 0 | 0 |
| | Ist. Instalment | | 10172 | 3623 | 0 | 0 | 0 |
| | Iind Instalment. | | 10172 | 2601 | 0 | 0 | 0 |
| | IIIrd Instalment | | 10172 | 1656 | 0 | 0 | 0 |
| | IV Instalment | | 10172 | 746 | 0 | 0 | 0 |
| | Total- | | **40688** | **8626** | 0 | 0 | 0 |
| 5 | **Total of 1 to 4** | | | | **107330** | **49314** | **156644** |
| 6 | Less- Withdrawals during the year. | | | | 60000 | 0 | **60000** |
| **7** | **Closing at the end of the year-** | | | | **47330** | **49314** | **96644** |

| Ist Instalment. | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **2009-10** | | **2010-11** | | **2011-12** | | 2012-13 | |
| Month & Year | Arrears credited | IBB | Arrears credited | IBB | Arrears credited | IBB | Arrears credited | IBB |
| 0 | 1 | 2 | 1 | 2 | 1 | 2 | 1 | 2 |
| April | 0 | 0 | 0 | 10850 | 0 | 11718 | 0 | 12679 |
| May | 0 | 0 | 0 | 10850 | 0 | 11718 | 0 | 12679 |
| June | 10172 | 10172 | 0 | 10850 | 0 | 11718 | 0 | 12679 |
| July | 0 | 10172 | 0 | 10850 | 0 | 11718 | 0 | 12679 |
| August | 0 | 10172 | 0 | 10850 | 0 | 11718 | 0 | 12679 |
| September | 0 | 10172 | 0 | 10850 | 0 | 11718 | 0 | 12679 |
| October | 0 | 10172 | 0 | 10850 | 0 | 11718 | 0 | 12679 |
| November | 0 | 10172 | 0 | 10850 | 0 | 11718 | 0 | 12679 |
| December | 0 | 10172 | 0 | 10850 | 0 | 11718 | 0 | 12679 |
| January | 0 | 10172 | 0 | 10850 | 0 | 11718 | 0 | 12679 |
| February | 0 | 10172 | 0 | 10850 | 0 | 11718 | 0 | 12679 |
| March | 0 | 10172 | 0 | 10850 | 0 | 11718 | 0 | 12679 |
| **Total-** | **10172** | **101720** | **0** | **130200** | **0** | **93744** | 0 | **152148** |
| **Average** | | **8476.66** | | **10850** | | **7812** | | **12679** |
| **Interest** | | **678** | | **868** | | 625 | | **1116** |
| | | | | | | **46872** | | |
| | | | | | | 3906 | | |
| | | | | | | 336 | | |
| | | | | | **Total** | 961 | | |
| | | | | Total interest= 678+868+961+1116 | | | | **3623** |